09 MAY 2025

लोकसत्ता

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# ‘ब्रेल लिपी’मधील पहिल्या शाहू चरित्र पुस्तिकेचे प्रकाशन

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

कोल्हापूर : दृष्टिहीन तसेच वंचित घटकांच्या ज्ञानवर्धनासाठी आधुनिक पद्धतीने प्रयत्न करणे आवश्यक आहेत. त्यासाठी समाजाने पुढे येणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन खासदार श्रीमंत शाहू छत्रपती महाराज यांनी येथे केले.



ब्रेल लिपीमधील पहिल्या शाहू चरित्र पुस्तिकेचे प्रकाशन करताना खासदार श्रीमंत शाहू छत्रपती, कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के.

शिवाजी विद्यापीठाच्या इतिहास अधिविभागाच्या वतीने आयोजित विक्रम रेपे संकल्पित राजर्षी शाहू महाराज ब्रेल पुस्तिकेच्या प्रकाशन सोहळ्याचे प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. त्यांच्या हस्ते पुस्तिकेचे प्रकाशन करण्यात आले. उपस्थित काही अंध विद्यार्थ्यांना प्रातिनिधिक स्वरुपात त्यांच्या हस्ते पुस्तिका प्रदान करण्यात आली. ब्रेल लिपीमध्ये प्रकाशित होणारे हे पहिलेच शाहूचरित्र आहे. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के होते, तर प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील प्रमुख उपस्थित होते.

कोल्हापूर पुरालेखागाराचे अभिलेखाधिकारी गणेशकुमार खोडके, मराठी अधिविभागाचे प्रमुख डॉ. नंदकुमार मोरे यांनी मनोगत व्यक्त केले. डॉ. अवनीश पाटील यांनी प्रास्ताविक, विक्रम रेपे यांनी सूत्रसंचालन तर कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी आभार मानले.

## राज्यात वितरण

शाहूचरित्राच्या ब्रेल पुस्तिकेचे मुद्रक स्वागत थोरात यांच्याकडून येत्या शैक्षणिक वर्षात महाराष्ट्रातील सर्व अंधशाळांमध्ये वितरण करण्यात येणार आहे. पुस्तिकेचा हिंदी व इंग्रजीमध्ये अनुवाद करण्याचाही मानस संकल्पक विक्रम रेपे यांनी व्यक्त केला.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
09 MAY 2025
पुढारी

संक्षिप्त

# पणदूर दाम्पत्याची संरक्षण निधीला पाच लाखांची देणगी

**कोल्हापूर :** कोल्हापुरातील डॉ. राम व हेमकिरण पणदूरकर या ज्येष्ठ दाम्पत्याने भारतीय राष्ट्रीय संरक्षण निधीसाठी पाच लाख रुपयांची देणगी देत दातृत्वाचा हात दिला आहे. देशासाठी आम्ही सीमेवर लढू शकत नाही, पण सैन्यदलासाठी हातभार लावू शकतो, या भावनेतून ही देणगी दिल्याची प्रतिक्रिया पणदूरकर दाम्पत्याने दिली आहे. पहलगाम येथील घटनेनंतर आपण काहीतरी मदत केली पाहिजे, या भावनेने त्यांनी मदतीचा धनादेश पंतप्रधान कार्यालयाकडे सुपूर्द केला. कन्या कै. रूपाली पणदूरकर यांच्या स्मृतिनिमित्त ही मदत केल्याचे त्यांनी सांगितले. डॉ. राम पणदूरकर हे शिवाजी विद्यापीठातील भूगोल विभागप्रमुख व ज्येष्ठ विधिज्ञ आहेत. यापूर्वीही या दाम्पत्याने विविध कारणांसाठी आर्थिक मदत केली आहे. पोस्टातील सुकन्या समृद्धी योजनेतूनही लहान मुलींसाठी दरवर्षी ते ठराविक पैसे भरतात.



जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
09 MAY 2025
पुण्यनगरी



# पणदूरकर दाम्पत्याकडून पाच लाखांची देणगी

**कोल्हापूर :** येथील हेमकिरण रामचंद्र पणदूरकर यांनी पहलगाम अतिरेकी हल्ल्यानंतर भारतीय लष्कराचे मनोधैर्य व वित्तीय वाढ करून देण्यासाठी भारतीय राष्ट्रीय संरक्षण निधीसाठी ५ लाख रुपये देणगी पंतप्रधान कार्यालय, दिल्ली यांच्याकडे दिली आहे. डॉ. राम पणदूरकर यांच्याकडे हा निधीचा चेक हस्तांतरित केला असून, तो पंतप्रधान कार्यालय, दिल्ली या ठिकाणी रवाना झाला आहे. यापूर्वी पणदूरकर यांनी शिवाजी विद्यापीठात कमवा व शिका योजनेंतर्गत गरीब मुलींसाठी अभ्यासिकेच्या सोयीसाठी ६० लाख रुपयांची देणगी दिली होती. त्याचे उद्घाटन १७ फेब्रुवारी रोजी केले आहे. त्यानंतर अडीच महिन्यांत पहलगाम येथील अतिरेकी हल्ल्यात २७ पर्यटक मारले गेल्याची घटना घडली. त्यामुळे सैनिकांचे मनोधैर्य वाढवण्यासाठी ५ लाख देणगी डॉ. रूपाली पणदूरकर यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ देण्यात आली. डॉ. राम पणदूरकर हे शिवाजी विद्यापीठाचे माजी भूगोल विभागप्रमुख व ज्येष्ठ विधिज्ञ आहेत.

जनसंपर्क कक्ष
0 9 MAY 2025
तरुण भारत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# एन्व्हायरमेंटल स्टडीजची परीक्षा रविवारी

प्रतिनिधी
कोल्हापूर

- विद्यार्थी व महाविद्यालयांनी दखल घ्यावी
- विद्यापीठाचे आवाहन

शिवाजी विद्यापीठ अंतर्गत पाच वर्षीय विधी अभ्यासक्रमातील सत्र –४ मधील एन्व्हायरमेंटल स्टडीज (Environmental Studies) या विषयाची परीक्षा वेळापत्रकानुसार १२ मे रोजी २.३० ते ५.३० या वेळेत आयोजित करण्यात आली होती. तथापि सर्व शाखेतील एन्व्हायरमेंटल स्टडीज या विषयाची परीक्षा रविवार दिनांक ११ मे रोजी दुपारी २.३० ते ५.३० या वेळेत आयोजित केली आहे. याची सर्व विद्यार्थी, कॉलेजनी दखल घ्यावी, असे आवाहन शिवाजी विद्यापीठातील परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी केले आहे. विद्यापीठाच्या मार्च/एप्रिल–२०२४ उन्हाळी सत्रातील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षा सुरू आहेत. बुधवारी बी.ए., बी.कॉम., बीएसस्सी, बीसीए, बीआयडी, बीएड्, एमएड, बीबीए, एमबीए, बॅचलर ऑफ लॉ, एम. ए., एम.एसडब्लू, एम. कॉम., डिप्लोमा कोर्स इन लँग्वेज, एमआरएस आदी १०९ अभ्यासक्रमाच्या परीक्षा झाल्या. ही परीक्षा २०२ परीक्षा केंद्रावर ३७ हजार ३५८ विद्यार्थ्यांनी दिली. कोल्हापूर १ तर सांगली, सातारा जिल्ह्यात एकही गैरप्रकार आढळला नाही.

0 9 MAY 2025

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# अल्प कालावधीतील प्रशिक्षणातून रोजगाराची संधी

अहिल्या परकाळे
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठातील आजीवन अध्ययन व विस्तार विभागात ६९ विविध अभ्यासक्रमांचे प्रशिक्षण दिले जाते. या केंद्रांतर्गत तिन्ही जिल्ह्यातून २ हजार विद्यार्थी प्रशिक्षण घेत आहेत. विभागातील प्रशिक्षणार्थींनी स्वत:चे व्यवसाय उभारले आहेत. विद्यार्थी महिला, ज्येष्ठ नागरिक, औद्योगिक कर्मचाऱ्यांना या अभ्यासक्रमाचा चांगलाच उपयोग होत आहे. यातून एक महिना ते वर्षापर्यंतच्या कौशल्याधिष्ठीत अभ्यासक्रमाच्या प्रशिक्षणार्थींचा सामाजिक, आर्थिक विकास होतो. नाममात्र प्रवेश शुल्कात व्यवसायाची, रोजगाराची संधी मिळत असल्याने विद्यार्थ्यांचा ओढा वाढत आहे.

आजीवन अध्ययन व विस्तार विभागात कौशल्यावर आधारीत




प्रशिक्षण घेऊन अनेक तरुण तरुणांनी व्यवसाय सुरू केला आहे. मोडी लिपी आणि इंग्रजी भाषा प्रभुत्वळामुळे अनेकांना रोजगाराची संधी उपलब्ध झाली आहे. कमीत कमी खर्चात आणि कमी वेळेत जवळपास हजारो प्रशिक्षणार्थींना रोजगार मिळाला आहे.

इव्हेंट मॅनेजमेंट, गार्डनिंग, चॉकलेट मेकींग, शिलाई मशिन, यासह अन्य अभ्यासक्रमांना ५०० ते १ हजारपर्यंत शुल्क आहे. घरातल्या घरात किचन गार्डन, टेरेस गार्डन आणि बाल्कनी गार्डन तयार करून अनेक महिलांनी दररोजची कोथींबिर, कडीपत्यासह भाज्यांचा प्रश्न निकाली काढला आहे. तर काहींनी ब्युटी पार्लर, छोटे मोठे इव्हेंट, खाद्यपदार्थांचे स्टॉल, प्लंबिंगसारखी कामेही सुरू केली आहेत. या अभ्यासक्रमांचे प्रशिक्षण घेणाऱ्या ८० टक्के प्रशिक्षणार्थींना व्यवसाय करण्याचे प्रोत्साहन व नोकरीची संधी मिळाली आहे.

**सामाजिक जबाबदारी म्हणून प्रौढांना आधार**

तंत्रज्ञानाच्या युगात ई बँकींगचे महत्व वाढले आहे. ई बँकींगमध्ये ज्येष्ठ नागरिकांची फसवणूक होवू नये म्हणून त्यांना प्रशिक्षण दिले जात आहे. तसेच ज्येष्ठ नागरिकांसाठी व्याख्यान, नाडी परीक्षण, योगा आदी उपक्रम राबवले जातात. त्यामुळे या केंद्राचा वृध्दांना चांगला लाभ होत आहे.

**सुरू असलेले अभ्यासक्रम**

बालवाडी प्रशिक्षण, ग्रंथालय व्यवस्थापन, ग्रामीण पत्रकारिता आणि जनसंवाद व्यक्तिमत्व विकास, इंग्रजी भाषा प्रभुत्व, मोडी लिपी, सेल्समनशिप, प्राकृत भाषा आणि जैन धर्म, फॅशन डिझायनिंग, टॅली, सुगम संगीत, हार्मोनियम, तबला, बेसिक ड्रॉइंग आणि पेंटिंग, शाहिरी कला, ब्युटी पार्लर, इव्हेंट मॅनेजमेंट, योगा, शेअर मार्केट, हिंदी अनुवाद, ड्रेस डिझायनिंग, इलेक्ट्रिकल घरगुती उपकरणांची देखभाल आणि दुरुस्ती, रेडिओ जॉकी, सुगंधित आणि औषधी वनस्पतींचा परिचय, ॲक्युप्रेशर, चॉकलेट बनवणे, क्लॉथ पेंटिंग, पॉट पेंटिंग यासह अन्य ६९ विषयाचे प्रशिक्षणाचा समावेश आहे.

- आजीवन अध्ययन आणि विस्तार विभागात ६९ शॉर्टटर्म अभ्यासक्रमाचे प्रशिक्षण
- तीन जिल्ह्यातून दोन हजार विद्यार्थी घेतात प्रशिक्षण

**दहावी-बारावी उत्तीर्णना प्रवेश घेता येतो**

आजीवन अध्ययन व विस्तार विभागात कमी कालावधीचे व्होकेशनल अभ्यासक्रमाचे प्रशिक्षण दिले जाते. यातून अनेक विद्यार्थ्यांनी स्वत:चा व्यवसाय केला असून काहीजण नोकरी करीत आहेत. एकाने नॅचरोपॅथी ज्युस सेंटर सुरू केले असून यामध्ये आवळा, गव्हांकुर आदींची विक्री केली जाते. जूनमध्ये प्रवेश प्रक्रिया सुरू होते. प्रवेशासाठी दहावी, बारावी उत्तीर्ण प्रमाणपत्र लागते.

**- डॉ. रामचंद्र पवार**
**(संचालक, आजीवन अध्ययन व विस्तार विभागात)**

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
0 9 MAY 2025
पुढारी

संक्षिप्त

## विद्यापीठ उन्हाळी सत्र परीक्षेला ३७ हजार ३५८ विद्यार्थी उपस्थित

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या मार्च-एप्रिल उन्हाळी सत्रातील परीक्षेला ३७ हजार ३५८ विद्यार्थी उपस्थित होते. दरम्यान, आजअखेर ६० अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर करण्यात आले आहेत. विद्यापीठ संलग्न महाविद्यालयात सध्या पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षा सुरु आहेत. गुरुवारी बीए., बीएस्सी., बीसीए., बीआयडी., बीबीए., एमबीए., बॅचलर ऑफ लॉ आदी १०९ अभ्यासक्रमांच्या परीक्षा झाल्या, अशी माहिती डॉ. अजितसिंह जाधव यांनी दिली.